अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## चव्हाणवाडी येथे कामगाराचा मृत्यू

टेंभुर्णी/प्रतिनिधी

विहिर खोदाईचे काम करीत असतान क्रेनचे बकेट डोक्यात पडून कामगाराच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी क्रेनचा मालक श्रीकांत शंकर झेंड (रा.बेंबळे ता.माढा) आणि क्रेनचा चालक धर्मेंद्र संजय कनोजिया (रा. उत्तर प्रदेश) या दोघावर टेंभुर्णीच्या पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

चव्हाणवाडी (ता.माढा) येथील निखिल मुळे यांच्या शेतात विहीर खोदण्याचे काम चालू होते. गुरुवारी दुपारी क्रेनच्या सहाय्याने बकेट खाली सोडताना त्याची कडी तुटून बकेट डोक्यात पडल्याने अनिल भीमराव आगवणे (वय ३५ रा.डॉ.आंबेडकर नगर,पंढरपूर) हे कामगार गंभीर जखमी होऊन मयत झाले होते. या प्रकरणी मयताचे बंधू सुनील आगवणे (रा.पंढरपूर) यांनी टेंभुर्णी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी क्रेनचे चालक आणि मालक या दोघाविरुद्ध गुन्हा दाखल केला.हवालदार तळेकर पुढील तपास करीत आहेत.



# केजरींना झाडूवाल्यांनीच झोडपले

# २७ वर्षांनी पुन्हा कमळ फुलले

- आम आदमीच्या १० वर्षांच्या सत्तेला सुरूंग
- राजधानीत भाजपच पुन्हा दबंग
- काँग्रेस पक्षाची पुन्हा उडाली दाणादाण

नवी दिल्ली

उभ्या देशाचे लक्ष लागून राहिलेल्या राजधानी दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत सत्ताधारी आम आदमी अर्थात आप या पक्षाला चारीमुंड्या चित करून भारतीय जनता पक्षाने निर्विवाद बहुमत मिळवून २७ वर्षांनी दिल्ली काबीज केली आहे. शनिवारी सायंकाळी हाती आलेल्या माहितीनुसार एकूण ७० पैकी भाजपने ४८,आम आदमी पक्ष २२ जागांवर आघाडी घेतली होती.बहुमतासाठी मॅजिक फिगर ३६चा आहे.त्यामुळे भाजपच्या पदरात निर्विवाद बहुमत दिल्लीश्वरांनी टाकले आहे.या निवडणुकीत ज्या पक्षाची हवा होती,त्या राष्ट्रीय पक्ष असलेल्या काँग्रेसला भोपळाही फोडता आला नाही. हरियाणानंतर दिल्लीच्या रूपाने अजून एक राज्य भाजपच्या ताब्यात गेल्याने इंडियातील घटक पक्षांना जबरदस्त हादरा बसला आहे. विशेष म्हणजे एक्झिट पोलने भाजपच्या पारड्यात कौल दिला होता. तो अंदाजही खरा ठरला.






दिल्ली विधानसभेची निवडणूक लागण्यापूर्वीच केजरीवाल आणि भाजप नेत्यांनी रणनीती आखून प्रचाराला सुरूवात केली होती. यावेळेस कुठल्याही स्थितीत भाजपच्या दिल्लीश्वर नेत्यांनी दिल्लीची सत्ता ताब्यात घेण्याचा चंगच बांधला होता तर दुसरीकडे ४० कोटींचे शिश महेल,मद्य घोटाळा आणि अनेक आमदारांचा तुरूंगवास यामुळे खुद्द आप पक्षातच यादवी माजली होती. प्रचाराचा रागरंग पाहता आप आणि भाजप यांच्यात काटे की कट्टर होईल, असा अंदाज वर्तवला होता.मतमोजणीत तसेच दिसून आले.कधी आप आगे,भापज पिछे तर केव्हा भाजप आगे,आप पिछे असे चित्र पहायला मिळाले. काही एक्झिट पोलनी केजरींना अनुकूलता दाखवली होती परंतु कौल पाहाता दिल्लीश्वरांनी आपला झाडू दाखवला आणि सत्ता भाजपच्या हाती दिली.

आता जय-पराजय यावरून राजकीय तज्ज्ञांचे विश्लेषण समोर येत आहे.पहिले कारण म्हणजे काँग्रेस तर दुसरे म्हणजे केजरींचा स्वकीयांनीच घात केला आहे केजरीवाल आणि आपच्या एवढ्या दारूण पराभवामागे काँग्रेस असल्याचे म्हटले जात आहे. केजरीवाल, सिसोदिया, सत्येंद्र जैन तर हरले आहेतच परंतु केजरीवालांनी ज्या विद्यमान आमदारांचे तिकिट कापले त्यांच्या जागी दिलेल्या २८ उमेदवारांचे काय झाले, असा प्रश्न अनेकांना पडला आहे. केजरीवाल यांच्या पक्षाच्या पराभवाला अनेक कारणे आहेत. यापैकीच एक कारण म्हणजे त्याा २८ पैकी बहुतांश जागांवर दगाफटका झाला आहे. पक्षाच्याच लोकांनी बंडाचे निशाण रोवले असावे असे सांगितले जात आहे. आपच्या ज्या आमदारांची तिकिटे केजरीवालांनी कापली होती, ते एकतर भाजपात सहभागी झाले होते किंवा काँग्रेसकडून आणि अपक्ष म्हणून देखील उभे ठाकले होते. या तिकिट कापण्याचा फटका आपला बसला असल्याचे सांगितले जात आहे.झाडूवाल्यांनीच केजरींना झोडपले,असा अनुमान काढला गेला आहे.

**अस्तित्वाचा प्रश्न :** भाजप २७ वर्षांनी राजधानीत सरकार स्थापन करणार आहे. भाजप ४७ जागांवर आघाडीवर आहे आणि आम आदमी पक्ष २३ जागांवर आघाडीवर आहे. काँग्रेसचे खातेही उघडलेले नाही. अशा परिस्थितीत आपला आता पाच वर्षे सरकार नसताना पक्ष टिकविण्याची कसरत करावी लागणार आहे. कोणतेही कार्यकर्त्यांचे बळ नसताना केवळ आंदोलनाच्या जिवावर उदयास आलेल्या पक्षाला आता अस्तित्व जिवंत ठेवण्यासाठी झगडावे लागणार असल्याचे मत राजकीय तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

**२७ वर्षांनी वनवास संपला :** २०१५ ला अवघ्या ३ जागा मिळवणाऱ्या भाजपाने दहा वर्षांत मुसंडी मारून सर्वाधिक जागा राजधानीत कमावल्या आहेत. दिल्लीत १९५२ मध्ये पहिल्यांदा विधानसभेची स्थापना झाली. त्यानंतर राजधानीला फक्त आठ विधानसभा आणि मुख्यमंत्री मिळाले आहेत. कारण १९५६ ते १९९३ या ३७ वर्षांच्या कालावधीत दिल्ली विधानसभा बरखास्त करण्यात आली आणि राज्याला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देण्यात आला. नोव्हेंबर १९९३ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाने ७० पैकी तब्बल ४९ जागा जिंकून दिल्लीचा तख्त ताब्यात घेतला. १९८४ मध्ये राजधानीत झालेल्या शीखविरोधी दंगलीत पक्षावर गंभीर आरोप झाले होते, ज्याचा थेट परिणाम निवडणूक निकालावर झाला. भाजपाने बहुमत मिळवल्यानंतर २ डिसेंबर रोजी मदन लाल खुराना यांनी दिल्लीचे तिसरे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली.

### पक्षांतर्गत कलह

१९९५ मध्ये खुराना यांच्यावर एका घोटाळ्याचा आरोप झाला, परिणामी एका वर्षापेक्षा कमी कालावधीत त्यांना आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला. त्याानंतर जाट नेते साहिब सिंग वर्मा यांनी २७ फेब्रुवारी रोजी दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. परंतु, अंतर्गत कलह आणि नेर्तत्वा मुळे राजधानीत भाजपाची स्थिती खराब होत गेली. १९९८ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी दक्षिण दिल्लीच्या तत्कालीन खासदार सुषमा स्वराज यांनी दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. पण २००३ मध्ये भाजपाचा पराभव झाला अन् काँग्रेसची सत्ता आली. पुढील १५ वर्षे म्हणजेच २०१३ पर्यंत काँग्रेसने दिल्लीवर राज्य केले.

## ट्रॅक्टरच्या धडकेने दुचाकी चालकाचा मृत्यू

सोलापूर : ट्रॅक्टरच्या धडकेने गंभीर जखमी झालेला दुयाकीवरील तरुण उपचारादरम्यान सोलापुरातील शासकीय रुग्णालयात शनिवारी पहाटे मयत झाला. अर्जुन प्रकाश जाधव (वय २२ रा. बालाजीनगर मंगळवेढा) असे मयताचे नाव आहे.



तो गुरुवारी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास दुचाकीवरून बालाजी नगर येथे येत होता. त्यावेळी बालाजीनगर पाटीजवळ समोरून एमएच१३-एजे- ३१६० या क्रमांकाचा ट्रॅक्टर धडकल्याने तो गंभीर जखमी झाला होता. त्याला सोलापुरातील शासकीय रुग्णाला दाखल केले असता तो शनिवारी मयत झाला. याची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## कारच्या धडकेत सहा वर्षीय मुलगा ठार

अक्कलकोट/प्रतिनिधी

कारची धडक बसुन सहा वर्षीय मुलगा जागीच ठार झाला. हा अपघात अन्नछत्र पार्किंग जवळील रस्त्यावर शनिवारी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास झाला.

हाजी मुमताज सय्यद (वय ६, रा. कांदा बाजार जवळ, अक्कलकोट) असे मयत मुलाचे नाव आहे. एम.एच ०८ झेड ७४५४ या कारच्या चालक प्रभु किसन आवार, (वय-३५, रा. मालेवाडी, ता.गंगाखेड, जि.परभणी) याने समोरुन जोराने येत हाजी यास धडक दिली. हाजी हा अन्नछत्र परिसरातील बगीचामध्ये जाऊन फिरुन सायंकाळी घरी निघाला होता. याप्रकरणी बाबत कारचालक यांच्या विरोधात उत्तर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे. फिर्याद मयताचा मामा दौला गफुर सय्यद, (वय ३४,रा. अक्कलकोट) यांनी दिली आहे.




### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




तुमची थंडी
मी समजू शकते !

कल्याण
348-51-678



# ऊर्जावान 'अजितदादां'चा सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रवादीच्या 'अच्छे दिन'साठी कोणता 'वादा?'



सोलापूर/शिवाजी भोसले

**सहकार क्षेत्राशी संलग्नित राजकारणाचा पोत असलेल्या सोलापूर जिल्ह्यात काँग्रेस-राष्ट्रवादीचे बुरूज २०१८ नंतर ढासळले. २०१४ पर्यंत अवघे २ आमदार असलेल्या भाजपनं पुढे जोरदार मुसंडी मारली. या जिल्ह्यातील सिंडेकट राजकारणाचा अस्त झाला. अकलूजकर मोहिते-पाटलांची जिल्ह्यावरची हुकमी पक्कड सैल झाली. 'कमळ' फुललेल्या या जिल्ह्यात भाजपची चांगली स्थिती आहे. तर बारामतीकर शरद पवारदेखील या जिल्ह्याच्या नेतृत्वाच्या मैदानात आहेत. त्यांच्या गटाचे चार आमदार या जिल्ह्यात आहेत. शिवाय अकलूजकर मोहिते-पाटील हे मोठ्या पवारांसोबत आहेत. दरम्यान, या परिस्थितीत सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रवादीला'अच्छे दिन' येण्यासाठी या पक्षाचे सर्वेसर्वा अजित पवार नेमके कधी लक्ष घालणार, त्यांचा 'मास्टर प्लॅन' तरी काय? स्वत:च्या पक्षाचा एकदेखील आमदार नसलेल्या या जिल्ह्यातील विस्कटलेली राष्ट्रवादी आपल्या नेतृत्वाच्या झेंड्याखाली आणण्यासाठी अजित पवारांच्या नजरतेला सेनापती (जिल्हाध्यक्ष) कोण? असणार, याची उत्सुकता सर्वांना आहे.**

विशेष म्हणजे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं नेतृत्व राज्यासाठी तसं अत्यंत 'ऊर्जा'वान आहे. त्यांच्या कामाचा आवाका धडाकेबाज आहे. प्रशासनावर त्यांची जबरदस्त पक्कड आहे. 'दादा अन् वादा' असं समीकरण त्यांच्या कामांच्याबाबीत मानले जात आहे.

तथापि, सोलापूर शहर-जिल्ह्यातील राष्ट्रवादीसाठी अजित पवारांचे 'ऊर्जा'वान नेतृत्व काय कामाचे? या जिल्ह्यातील आपल्या पक्षाला उर्जितवस्था आणण्यासाठी गॉडफादर धडाकेबात दादा कधी लक्ष घालतील त्यांचा मास्टर प्लॅन कोणता? हे काहीच समजत नसल्याने 'बडा घर पोकळ वासा' अशीच आपल्या पक्षाची जिल्ह्यात गत असल्याचे दबक्या सुरात पक्षाचे निष्ठावंत आणि प्रामाणिक कार्यकर्ते बोलू लागले आहेत.

राष्ट्रवादीच्या स्थापनेनंतर सुरुवातीला यशवंतभाऊ पाटील हे या पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहिले. तद्नंतर शेटफळ-मोहोळचे मनोहर डोंगरे हे अध्यक्ष झाले. त्यांच्या अध्यक्षपदाच्या काळात जिल्ह्यात राष्ट्रवादी आबादी आबाद होती. त्यानंतर बळीराम साठे आणि दीपक साळुंके यांच्या कार्यकाळात या पक्षाला जणू ओहटी लागली. राष्ट्रवादीचे बुरुज ढासळले. भाजपने प्रत्येक ठिकाणी जोरदार मुसंडी मारत 'कमळ' फुलवले. पक्षाची वाताहत झाली.

उल्लेखनीय बाब म्हणजे राष्ट्रवादीच्या फाटाफुट झाल्यानंतर अजित पवार राष्ट्रवादी गटानं जिल्ह्यात मोहोळ आणि माढा या अवघ्या दोन ठिकाणच्या जागा लढविल्या. त्या दोन्ही ठिकाणी पक्षाच्या उमेदवाराचे पानिपत झाले. बारामतीकर अजित पवारांचे खमके नेतृत्व असताना सोलापूर जिल्ह्यात त्यांच्या पक्षाचे काय? हा मुद्दा सातत्याने उपस्थित केला जातोय. आमदारकीच्या निवडणुकित सोलापूर जिल्ह्यात आलेले अपयश लक्षात घेता, अजित पवार यांनी या जिल्ह्याकडे जाणीवपूर्वक दूर्लक्ष केलं आहे का? असादेखील सवाल सर्वसामान्या निष्ठावंत कार्यकर्ते दबक्या आवाजात उपस्थित करीत आहेत.

विधानसभा निवडणुकिच्या तोंडावर दीपक साळुंके यांनी राष्ट्रवादी मनगटावरील 'घड्याळ' बाजूला करुन हाती शिवसेनेचा धनुष्यबाण घेतला. तेव्हांपासून अजित पवार राष्ट्रवादी गटाचे सोलापूर जिल्ह्याचं अध्यक्षपद मोकळेच आहे. तगड्या नेतृत्वाच्या अजित पवारांच्या पक्षाचे जिल्हाध्यक्ष कोणी नसावं? यापेक्षा दुसरी शोकांतिका काय असू शकते, असंदेखील निष्ठावंत म्हणू लागले आहेत.








### नेतृत्व 'ऊर्जा'वान पण राष्ट्रवादी सावरण्यासाठीच्या प्रयत्नांचे काय?

### सोलापुरात राष्ट्रवादी दिसते हो, पण जिल्ह्याचं काय?

सोलापूर शहरात अजितदादा पवारांची राष्ट्रवादी ग्रामीणच्या तुलनेत 'ऊर्जा'वान दिसते. भले येथे वेगवेगळे गट असतील. पण खमक्या नेतृत्वाचे नेते आहेत. संतोष पवार, किसन जाधव, जुबेर बागवान, नागेश गायकवाड आदींनी या पक्षाच्या घड्याळाचा गजर येथे ठेवला आहे. तरीपण गॉडफादर अजित पवारांकडून शहरातील पक्ष विस्तारासाठी ऊर्जा मिळायला हवी, असा बोलबाला आहे.

### कार्यकर्त्यांना वाटतं 'बडा घर पोकळ वासा' काय कामाचा?

### मोहोळ अन् रामवाडी पुरतीच राष्ट्रवादीची हवा?

पाठीमागच्या काही वर्षांपर्यंत सोलापुरातील पत्रा तालीम आणि लक्ष्मीविष्णू चाळ येथेच फक्त राष्ट्रवादी दिसते अशी कुत्सितपणे टीका केली जात होती. त्यानंता आता मोहोळ तालुका आणि सोलापुरातील रामवाडी सेंटलमेंट या ठिकाणीच राष्ट्रवादी दिसते, तिथेच या पक्षावी हवा आहे, अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या जातात.

### नेतृत्व कुणा म्हणू मी?

दीपक साळुंके यांच्यानंतर अजित पवार राष्ट्रवादी गटाचा सोलापूर जिल्हा अध्यक्ष निवडला गेला नाही. जिल्हास्तरावर नेमकं नेतृत्व कोणाचं हे समजत नाही. काम करुन घेण्यासाठी नेमकं कोणाकडं जावे हे कळत नाही.थेट अजित पवारांकडे गेल्यास थेट माझ्याकडे कसे काय आलात? खाली कोणी नाही का? असं ते निश्चितपणे म्हणत शाब्दिक फायरिंग करणार हे निश्चित.या सगळ्या पार्श्वभूमीतून अजित पवार राष्ट्रवादी गटाचं जिल्ह्याचं सगळं काही ठप्प आहे, हे वास्तव आहे.